**अपिलेट प्राधिकरण, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन**
**यांच्यासमोरील पुर्ननिरिक्षण अर्ज**

बिल्टटयुब इंडस्ट्रीज लि.,
मु.कोडोली.ता.पन्हाळा, वादी
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पाँईट, ३ रा मजला, प्रतिवादी
सायन (पूर्व) मुंबई.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बिल्टटयुब इंडस्ट्रीज लि., या उद्योगास जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २५ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम २१ नुसार उद्योग स्थापन करण्यास दिलेल्या परवानगीला मुदतवाढ नाकारण्याबाबत.**

**प्रस्ताव-**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे बिल्टटयुब इंडस्ट्रीज लि., या उद्योगाने जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २५ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम २१ अन्वये उद्योग स्थापन करण्यास दिलेल्या परवानगीला मुदतवाढ मिळणेसाठी अर्ज केला होता. सदर अर्ज मंडळाने सांडपाण्याची गुणवत्ता विहीत मर्यादेपर्यत नाही व शून्य निष्कासन साध्य केले नसल्यामुळे फेटाळला. त्याविरुध्द कंपनीने अपिलेट प्राधिकरणाकडे अर्ज सादर केला.

सुनावणीच्या दिवशी कंपनीने असे सादर केले की,आता कंपनीने सांडपाण्याची गुणवत्ता विहीत मर्यादेपर्यत साध्य केली आहे. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर बाब तपासावी. व शुन्य निष्कासन साध्य झाले आहे किंवा कसे, याबाबत देखील तपासणी करुन सविस्तर अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासहीत अपिलेट प्राधिकरणास सादर करावा, असा निर्णय झाला.

| | | |
|---|---|---|
| अधिक्षक अभियंता | जल अभियंता | सचिव |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, | बृहन्मुंबई,महानगरपालिका मुंबई | पर्यावरण विभाग, मंत्रालय, |
| सदस्य, अपिलेट प्राधिकरण | सदस्य, अपिलेट प्राधिकरण | अध्यक्ष,अपिलेट प्राधिकरण |